**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपल्या दौऱ्याच्या अंतिम टप्प्यात नामिबियाच्या विंडहोकमध्ये दाखल

- गुजरातमधे वडोदरा जिल्ह्यात पूल कोसळून झालेल्या अपघातात ९ जणांचा मृत्यू, प्रधानमंत्र्याकडून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख रुपये आर्थिक मदतीची घोषणा

- विदर्भात मुसळधार पावसामुळे पूरस्थिती, बचाव आणि मदतकार्य सुरू असल्याची मुख्यमंत्र्यांची विधानसभेत माहिती

**आणि**

- अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची बांगलादेशी वस्तूंवर ३५ टक्के नवीन कराची घोषणा

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपल्या पाच-देशांच्या दौऱ्याच्या अंतिम टप्प्यात नामिबियाच्या विंडहोकमध्ये पोहोचले आहेत. नामिबियाचे आंतरराष्ट्रीय संबंध आणि व्यापार मंत्री सेल्मा अशिपाला-मुसवी यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. स्वागतासाठी पारंपरिक गरबा नृत्य सादर करण्यात आलं. प्रधानमंत्री मोदी नामिबियाचे राष्ट्राध्यक्ष नंदी नैतवाह यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा करणार असून ते नामिबियाच्या संसदेत भाषणही करणार आहेत. नामिबिया एक विश्वसनीय आफ्रिकन भागीदार असून त्यासोबत भारत द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यासाठी प्रयत्न करत आहे असं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. भारतीय प्रधानमंत्र्यांचा नामिबियाचा हा दौरा जवळपास तीन दशकांनंतरचा आहे.

**<><><><><>**

गुजरातमध्ये वडोदरा जिल्ह्यात पदर इथं आज पहाटे पुलाचा काही भाग महिसागर नदीत कोसळून झालेल्या दुर्घटनेत ९ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. आणंद आणि वडोदरा जिल्ह्यांना जोडणारा हा पूल होता.

अपघात झाल्यानंतर वडोदरा जिल्हा प्रशासनानं तातडीनं बचावकार्य हाती घेतलं असून, स्थानिक नागरिकही त्यांना मदत करत आहेत. आणंद इथून अग्निशमन दलाच्या तीन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. वाहनांची वाहतूक सुरू असताना हा पूल कोसळला. त्यामुळे अनेक वाहने पाण्यात वाहून गेली. बचावकार्य युद्धपातळीवर सुरू असल्याची माहिती वडोदराचे जिल्हाधिकारी अनिल धमोलिया यांनी दिली. दरम्यान, NDRF ची पथक अपघातस्थळी दाखल झाले असून ते देखील मतदकार्यात सहभागी झाले आहेत. हा पूल नेमका कशामुळे कोसळला याचा तपास करण्यासाठी गुजरात सरकारनं तांत्रिक तज्ज्ञांच्या समितीची नियुक्ती केली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. प्रधानमंत्र्यांनी या दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी दोन लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये आर्थिक मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

भारतातल्या दहशतवादी हल्ल्यांसाठी लागणाऱ्या शस्त्रसामुग्रीची खरेदी आणि त्यासाठीचा आर्थिक व्यवहारांसाठी ई-कॉमर्स वेबसाईट तसंच ऑनलाईन पेमेंट सेवांचा गैरवापर झाल्याचा दावा फायनांशियल ॲक्शन टास्क फोर्स- F.A.T.F. नं केला आहे. जम्मू आणि काश्मिरमधील पुलवामा इथं २०१९ मध्ये सीआरपीएफच्या ताफ्यावर आणि उत्तर प्रदेशातल्या गोरखनाथ मंदिरावर २०२२ मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यांचा यात समावेश आहे.

दहशतवाद्यांना थेट आर्थिक मदत करणं, त्यांना शस्त्रास्त्रे, रसद पुरवण्याबरोबरच त्यांना दहशतवादी कारवायांचं प्रशिक्षण देण्यासाठी सोशल मीडिया, विविध प्रकारचे मेसेज ॲप्लिकेशन, डिजीटल प्लॅटफॉर्म, क्राऊडफंडिंगच्या साईट्सचा वापर केला जात असल्याचं F.A.T.F. नं प्रसिद्ध केलेल्या दहशतवाद्यांना निधीपुरवठ्याचा धोका या विषयावर प्रसिद्ध केलेल्या अहवालात नमूद केलं आहे. पुलवामा इथं २०१९ मध्ये भारतीय सुरक्षा दलावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात ४० जण शहीद झाले होते. हा आत्मघाती हल्ला जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेनं केल्याचं तपासात समोर आलं होतं. तसंच या हल्ल्यासाठी वापरलेली काही उपकरणं ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवरून मागवल्याचंही तपासाअंती सिद्ध झालं.

**<><><><><>**

पंजाब पोलिसांनी आज गुप्तचर माहितीच्या आधारे केलेल्या कारवाईत शस्त्रास्त्र साठा आणि दारुगोळा जप्त केला आहे. त्यात गुरुदासपूर इथल्या जंगलात सापडलेल्या दोन AK-47 रायफली, १६ जिवंत काडतुसं, दोन मॅगझीन आणि दोन P-86 हँड ग्रेनेड यांचा समावेश आहे. प्राथमिक तपासाद्वारे पाकिस्तानच्या बब्बर खालसा इंटरनॅशनलच्या द्वारे राज्यात अनेक ठिकाणी हल्ले घडवण्यासाठी आखलेला दहशतवादी कट पंजाब पोलिसांनी उधळला. याप्रकरणी अधिक तपास सुरु आहे.

**<><><><><>**

विदर्भात बहुतांश जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचून अनेक रस्ते बंद झाले आहेत तसच नद्या आणि नाले दुथडी भरुन वाहत आहेत. वर्धा इथं यशोदा नदीला पूर आल्यानं वर्धा ते राळेगाव रस्ता बंद झाला आहे. नागपूर महानगरपालिका आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापनानं बचाव कार्य सुरू केलं आहे. हवामान विभागानं नागपूर आणि वर्धा जिल्ह्यासाठी आज मुसळधार पावसाचा

ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या पार्श्वभूमीवर नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात आज सर्व शाळा आणि महाविद्यालयांसाठी सुट्टी जाहीर केली आहे. कळमेश्वर तालुक्यात अतिवृष्टीमुळे एकाचा मृत्यु झाला आहे.

**<><><><><>**

विदर्भात मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली असून शासनाने बचाव आणि मदतकार्य सुरू केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली. याबाबतचा प्रश्न सदस्य नाना पटोले यांनी उपस्थित केला होता. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले.

**होल्ड.. बाईट - मुख्यमंत्री**

मुंबईतल्या डोंगराळ भागात दरड कोसळण्याचं प्रमाण लक्षात घेऊन याबाबत नव्याने सर्वेक्षण करण्यात येईल आणि आय आय टी मुंबईने यावर सुचवलेल्या उपाययोजनांनुसार कारवाई करण्यात येत आहे, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी आज विधानसभेत दिली. याबाबतचा मूळ प्रश्न सुनील राऊत यांनी उपस्थित केला होता, त्यावर राम कदम, अजय चौधरी, अशोक पाटील यांनी उपप्रश्न विचारले. २०१७ साली भारतीय भौगोलिक विभागानं केलेल्या सर्वेक्षणानुसार मुंबई महापालिकेच्या हद्दीत एकूण ७४ दरड ग्रस्त ठिकाणं असून त्यातील ४६ ठिकाणं अतिधोकादायक आहेत. त्यापैकी ४० उपनगरात आहेत. आय आय टी मुंबई ने यावर काही उपाययोजना सुचवल्या आहेत, त्यानुसार ४७ कामांपैकी ४५ कामे पूर्ण करण्यात आली आहेत, ती म्हाडा आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीनं करण्यात येतात, असं मंत्री म्हणाले.

अनुदानित शाळांना टप्पा अनुदान वेळेवर मिळावं यासाठी मुंबईत शिक्षकांचं आंदोलन सुरू आहे. त्यावर मुख्यमंत्री स्तरावर चर्चा होणार असून त्यात त्यावर तोडगा काढण्यात येईल अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिली, याबाबतचा प्रश्न विजय देशमुख यांनी उपस्थित केला होता. जयंत पाटील यांनी

त्यावर उपप्रश्न विचारले. राज्यातील अल्पसंख्य शाळांचा दर्जा मिळवण्यासाठी गैरप्रकार झाल्याच्या तक्रारीनुसार एक समिती स्थापन करून राज्यव्यापी तपासणी मोहीम राबवण्यात येईल, अशी घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी केली, याबाबतचा प्रश्न गजानन लवटे यांनी उपस्थित केला होता त्यावर प्रशांत बंब, नाना पटोले यांनी उपप्रश्न विचारले होते.

**<><><><><>**

छत्रपती संभाजी नगर इथं विद्यादीप बालसुधारगृहमधे अल्पवयीन मुलीवर होणाऱ्या अत्याचाराची घटना, अतिशय गंभीर असून, या प्रकरणी जिल्हा बालविकास अधिकाऱ्याविरोधात कारवाई करत तत्काळ त्याचं निलंबन केलं जाईल, तसंच संबंधित संस्थेची मान्यता देखील रद्द करण्याचे निर्देश मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिले. आमदार चित्रा वाघ यांनी अल्प सूचना प्रश्नाद्वारे हा मुदा सभागृहात नियमित कामकाजाला सुरुवात होताच उपस्थित केला.

या बालगृहातील अल्पवयीन मुलींवर, मारहाण करण्यासह अनेक अमानवी पद्धतीनं छळ चालू होता. त्यांच्यावर धर्मांतर कारण्याचाही दबाव होता, असा मुद्दा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनीही उपस्थित केला. या प्रकरणी चौकशी करण्यासाठी तीन वरिष्ठ महिला पोलीस निरीक्षकांची समिती स्थापन केली असून, त्यांनी या बालगृहाला भेट दिली असून, अनेक पीडित मुलींशी चर्चा करून या प्रकरणाची संपूर्ण माहिती घेतली आहे. उद्या ही समिती आपला अंतिम अहवाल देणार आहे. अहवाल आल्यानंतर, या प्रकरणात, सरकारी यंत्रणेतील जे कुणी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे सहभागी असतील, त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं.

मुंबई उच्च न्यायालयानेही अमायकस क्युरे अंतर्गत याची दखल घेत पावले उचलली आहेत, याची माहिती फडणवीस यांनी सभागृहाला दिली. मात्र राष्ट्रीय

महिला आयोगानंही या प्रकरणाची दखल घेत, गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत, तरी राज्य महिला आयोग या गंभीर प्रकरणी कधी कारवाई करणार, अशी टीका दानवे यांनी केली.

**<><><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बांगलादेशी वस्तूंवर ३५ टक्के नवीन कराची घोषणा केली आहे. हा कर १ ऑगस्टपासून लागू होणार आहे. या आधी एप्रिलमध्ये अमेरिकेनं बांगलादेशी वस्तूंवर ३७ टक्के कराची घोषणा केली होती. याचा जास्त फटका बांगलादेशाच्या कपड्यांच्या व्यापाराला बसेल कारण मुख्य प्रतिस्पर्धी व्हिएतनामचा दर २० टक्के आहे. या निर्णयाचा उद्देश बांग्लादेश आणि इतर देशांशी व्यवहारांतून व्यापार अडथळे काढून टाकणं हा असल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. बांगलादेशाचे वित्त सल्लागार डॉ. सालेहुद्दिन अहमद यांनी चर्चांद्वारे कराचा दर कमी केला जाऊ शकतो अशी आशा व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**

.